# कृषि विज्ञान केंद्राचे शेतकऱ्यांसाठी महत्त्व

**डॉ. जगदीश वाडकर**
कृषी विस्तार शास्त्रज्ञ
कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा

**सागर पाटील**
आचार्य पदवी विद्यार्थी (कृषीविद्या विभाग)
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कृषि विज्ञान केंद्र हा भारत सरकारचा उपक्रम असून भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली द्वारे या केंद्रास अर्थसहाय्य केले जाते. सन १९७४ मध्ये प्रथम देशात पॉन्डेचेरी येथे फार्म सायन्स सेंटर या नावाने पहिल्या कृषी विज्ञान केंद्राची स्थापना झाली. आज रोजी देशात एकूण ७२२ कृषि विज्ञान केंद्रे कार्यरत असून त्यातील बहुतांश केंद्रे ही कृषि विद्यापीठामार्फत चालविली जातात. तर काही कृषि विज्ञान केंद्रे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या संशोधन संस्थामार्फत कार्यरत आहे. त्यापैकी ४९ कृषि विज्ञान केंद्रे महाराष्ट्रात आहेत. प्रत्येक जिल्ह्यात एक अशाप्रमाणे कृषी विज्ञान केंद्राची स्थापना केली गेली असून ज्या जिल्ह्यांचे क्षेत्रफळ जास्ती आहे अशा जिल्ह्यासाठी दोन कृषी विज्ञान केंद्राची स्थापना केली गेली आहे. शेती करत असताना शेतकऱ्यांना अनेक समस्या येत असतात या समस्या किंवा आवशयक माहिती मिळविण्यासाठी शेतकरी या ठिकाणी संपर्क करून आपल्या शंकाचे समाधान करू शकतो आणि नाविन्यपूर्ण शेती तंत्रज्ञान मिळवू शकतो.




### कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख उद्देश:

कृषि विज्ञान केंद्र हे प्रामुख्याने संशोधित तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी काम करते. नाविन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान संशोधनातून प्राप्त होत असते ते शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक असते. या करिता वेगवेगळ्या विस्तार कार्यक्रमाद्वारे या तंत्रज्ञान प्रसाराचे काम केले जाते. यामधे स्थानिक गरजांवर आधारित व शेती पद्धतीच्या अनुषंगाने शेतावरील चाचण्यांचे आयोजन करून नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान त्या जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीस योग्य किंवा चांगले आहे का? किंवा कसे आहे हे पहिले जाते. नवीन संशोधित तंत्रज्ञान चांगले असल्यास मोठ्या प्रमाणात प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाते. या प्रात्यक्षिकाद्वारे प्रसार व्हवा हा उद्देश ठेऊन प्रात्यक्षिकाचे आयोजन करून गावागावात शेतकऱ्यांमध्ये जागृती केली जाते. हे आधुनिक कृषि तंत्रज्ञान प्रसार करणेसाठी, शेतकऱ्यांच्या ज्ञानात वृद्धी होण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.

शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, रोपे/कलमे, जैविक खते, पशुधन यांसारख्या तांत्रिक निविष्ठा उपलब्ध करुन देणे. शेती आणि शेती आधारित व्यवसायाबाबत जाणीवजागृती आणि त्याचा गतीने प्रसार आणि अवलंब होण्याच्या दृष्टीने विविध विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करणे. शेतकऱ्याच्या आर्थिक परस्थितीत सुधारणा करणे, सार्वजनिक, खासगी आणि सेवाभावी क्षेत्राच्या प्रयत्नास तांत्रिक सहाय्य करणे आणि त्यासाठी जिल्ह्यात शेती तंत्रज्ञानाचे स्रोत आणि ज्ञान केंद्र म्हणून कार्य करणे हे या कृषि विज्ञान केंद्राचे उद्देश आहेत.

### कार्यालयीन कर्मचारी व्यवस्था:

कृषि विज्ञान केंद्रात एकूण १६ कर्मचारी काम करतात. यामध्ये एक कार्यालय प्रमुख (कार्यक्रम समन्वयक/वरिष्ठ शास्त्रज्ञ), सहा शास्त्रज्ञ (विषय विशेषज्ञ), त्यांच्या मदतीला पाच सहाय्यक (प्रक्षेत्र व्यवस्थापक, कॉम्पुटर प्रोग्रामर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्टेनोग्राफर, अकाउंटंट), दोन कुशल मदतनिस आणि दोन वाहन चालक कार्यरत असतात. सध्या कृषि विज्ञान केंद्रात कृषिविद्या, उद्यानविद्या, कृषि विस्तार शिक्षण, मृदशास्त्र, पीक संरक्षण, पशूविज्ञान, अन्नतंत्र, कृषि हवामान शास्त्रज्ञ आणि कृषि अभियांत्रिकी इत्यादी विषयापैकी फक्त सहा तज्ञ असतात.

### कृषि विज्ञान केंद्राचे प्रक्षेत्र, प्रात्यक्षिक प्रक्षेत्र व प्रयोगशाळा:

कृषि विज्ञान केंद्राकडे स्वत:चे नियामाप्रमाणे कमीत कमी एकूण २० हेक्टर प्रात्यक्षिक प्रक्षेत्र असते. त्यात शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटीच्या वेळी प्रात्यक्षिकाद्वारे तंत्रज्ञान दाखविले जाते. याशिवाय प्रक्षेत्रावर शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, रेशीमशेती, रोपवाटिका, शेडनेटहाऊस, पॉलीहाऊस, फळे व भाजीपाला प्रक्रिया, मशरूम उत्पादन इत्यादी प्रात्यक्षिक युनिट असतात. यापासून शेतकऱ्यांना शेतीपूरक जोडधंद्याची प्रत्यक्ष माहिती दिली जाते आणि त्याचे अर्थशास्त्र व फायदे समजावून सांगितले जातात. तसेच व्यावसायिक

प्रशिक्षणाच्या वेळी हे युनिटस महत्त्वाची भूमिका बजावतात. शेतकऱ्यांच्या सेवेसाठी कृषि विज्ञान केंद्रात माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खते आणि औषधी निर्मिती प्रयोगशाळा असतात. या प्रोयोगशाळेमार्फत शेतकऱ्यांना विविध जैविक निविष्ठा आणि माती व पाणी परिक्षण करुन दिले जाते.

**उपलब्ध सोयी सुविधा:**

कृषि विज्ञान केंद्राद्वारे शेतकरी व संबंधित गरजूंना खालील सोयीसुविधा पुरविल्या जातात.

- शेती संबंधित सर्व विषयांवरील तांत्रिक मार्गदर्शन
- सोयाबीन, तूर, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांच्या सुधारित वाणांचे बियाणे
- मोसंबी, डाळींब, आंबा, पेरू, सीताफळ यांसारख्या फळपिकांची कलमे/रोपे
- रायझोबियम, पी.एस.बी., ट्रायकोडर्मा, सुडोमोनास व तत्सम जैविक निविष्ठांचा पुरवठा
- गायी, शेळ्या, म्हशी, पशुधन चिकित्सा इत्यादी सेवा
- जमिनीतील मुख्य, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची तपासणी तसेच शेतीसाठी पाणी तपासणी इत्यादी
- पिक पडताळून त्यानुसार खतांच्या औषधांच्या शिफारशी
- गृह विज्ञान विभागामार्फत महिलांसाठी श्रम कमी करणारा सुलभ कापूस वेचणी कोट, तत्सम अवजारे आणि महिलांचे आरोग्य, व्यवस्थापन मार्गदर्शन तसेच बचतगट मार्गदर्शन तसेच शेतकऱ्यांच्या आहार व्यवस्थापनाबाबत खाद्यपदार्थ आणि फळ प्रक्रिया मूल्यवर्धन व त्याबाबत मार्गदर्शन
- कृषि अभियांत्रिकी सेवा उदा. औजारे माहिती आणि व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, सामूहिक शेततळे, पॅकहाऊस, शेडनेटहाऊस याबाबत तांत्रिक मार्गदर्शन

**कृषि विज्ञान केंद्राचे उपक्रम:**

शेतावरील चाचणी प्रयोग, प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षण कार्यक्रम हे कृषि विज्ञान केंद्राचे उपक्रम असून हे उपक्रम दत्तक गावात तीन ते चार वर्षे राबवण्यात येऊन तेथील शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापराबाबत प्रेरित केले जाते आणि शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण केला जातो. शेतकरी मेळावे, शिवारफेऱ्या, निदानात्मक भेटी, अभ्यास सहली, वृत्तपत्रातून लेख, शेतकऱ्यांच्या यशोगाथा इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून या प्रयोगांचे निष्कर्ष शेतकऱ्यांमार्फत पोहचविण्यात येतात. दरवर्षी अशा उपक्रमातून शेतकऱ्यांना तंत्रज्ञान माहिती मिळते, ज्ञानात वृद्धी होते. नावीन्यपूर्ण उपक्रम शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या सहभागाने व पुढाकाराने उपक्रम राबविले जातात ते उपक्रम यशस्वी होतात अशी या केंद्राची कार्यपद्धती असून त्याच उद्देशाने खालील नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत.

कृषी क्षेत्रातील हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम असून त्याद्वारे शेतकरी व कृषी उद्योजकांना मार्गदर्शन केले जाते. तळागाळातील शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देऊन ग्राम विकास साधण्याचा हा प्रकल्प आहे. शास्त्रशुद्ध मार्गदर्शनासाठी कृषी विज्ञान केंद्राने एक आदर्श मार्गदर्शन व्यवस्था निर्माण केली आहे. कृषी विज्ञान केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत माती व पाणी परीक्षण प्रयोग शाळा, पोस्ट हार्वेस्ट टेक. प्रयोगशाळा आणि कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र आहे. ४० शेतकऱ्यांची शेतकरी निवासमध्ये व्यवस्था या ठिकाणी आहे. या केंद्रात अत्याधुनिक शेतीचे प्रशिक्षण देण्याबरोबरच कीड नियंत्रण, रोग नियंत्रण याचेही प्रशिक्षण दिले जाते. गांडूळखत तयार करण्याचे प्रशिक्षणही दिले जाते. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या सहभागाने ग्राम दत्तक योजनेद्वारे मोठ्या प्रमाणावर आधुनिक शेतीचे प्रशिक्षण दिले जाते.

फिरती माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा: मानव विकास मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा प्रशासनामार्फत व कृषि विभागाच्या समन्वयाने एक फिरती माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळा कृषि विज्ञान केंद्रामार्फत जिल्ह्यात कार्यरत आहेत. विविध भागात गावात जाऊन तपासण्या केल्या जातात, शेतकऱ्यांना जागेवरच अहवाल देण्यात येतात. हवामान आधारित कृषि सल्ला सेवा: भारतीय हवामान खात्याकडून प्राप्त होणारे हवामान आधारित कृषि संदेश त्यांच्या मोबाईलवर मराठी भाषेत पाठविण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत आठवड्यातून दोन वेळेस शेतकऱ्यांना, कृषी विभाग क्षेत्रीय कर्मचारी यांना हवामान संदेश आणि सोबत पिक व्यवस्थापनाबाबत माहिती संदेश पाठविला जातो. शेतकऱ्यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणारे उपक्रम, शेतकऱ्यांच्या गरजेनुसार त्यांच्या गटांना सहाय्य करण्याचे धोरण केंद्राने ठेवले आहे. याअंतर्गत खालील शेतकऱ्यांचे गट कार्यरत असून कृषि विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाखाली प्रगती करीत आहेत. सामाजिक उपक्रम: वरील कार्यक्रमांशिवाय सामाजिक बांधीलकीचे भान ठेवून दरवर्षी स्वच्छता पंधरवडा, धूलिवंदन आणि कोजागिरी पौर्णिमा, महिला दिन, जल दिन, किसान दिन ई. दिवसांचे औचित्य साधून कृषि विज्ञान केंद्रात कार्यक्रमांचे आयोजित करुन कोणत्याही सामाजिक समस्या, उपययोजना ई. विषयावर चर्चा करण्यासाठी मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते.

म्हणून या ठिकाणी शेतकऱ्यांनी स्वतःसाठी आपल्या जवळच्या कृषि विज्ञान केंद्रावर संपर्क साधावा. नाविन्यपूर्ण शेती तंत्रज्ञान, उपक्रमाचा लाभ घ्यावा आणि आपल्या शेती व्यवसायातील समस्या आणि शंकाचे समाधान करून घ्यावे. या केंद्राच्या संपर्कात यावे आणि प्रगतशील, नाविन्यपूर्ण आणि नफ्याची शेती करावी असे आवाहन करण्यात येत आहेत.

★ ★ ★ (संपर्क: +९१ ९४२२९०२२००)